# Prototyping

## स्वस्तातील व्हॅक्युम क्लिनर
## (Low Cost Vaccume Cleaner)

### समस्या:

गेली एक वर्षभरापासून शाळेजवळील बेल्हा-जेजुरी या राज्य मार्गाचे काम सुरु होते त्यामुळे सतत तेथील धूळ, इतर कचरा शाळेत, वर्गात, व्हरांड्यात येत होता. झाडून घेतले तरी पुन्हा धुळ जमा व्हायची ती धूळ, कचरा साफ करण्यासाठी स्वस्तातील व्हॅक्युम क्लिनर तयार केला.

### प्रकल्प:

आम्ही वरील समस्या सोडविण्यासाठी उर्जा-पर्यावरण या विभागामध्ये प्लास्टिकचा ड्रम झाकणासहित, फॅन, फ्लेक्सिबल पाईप, चाळणी, आणि स्वीच इ. साहित्य वापरून स्वस्तातील व्हॅक्युम क्लिनर तयार केला. याचा वापर करताना ड्रमला चाके असल्याने तो जिथला कचरा साफ करायचा आहे तिथे सर्वत्र फिरवावा. यामध्ये फॅनमुळे बाहेरील हवा आत ड्रम मध्ये शोषली जाते आणि ड्रम मध्ये पुढे दाबाने ढकलली जाते. या हवेबरोबर तेथील धूळ, कण, कचरा देखील आत शोषला जातो. ड्रमच्या आतील चाळणीत कचरा जमा होतो आणि बाकीची हवा फिल्टर होऊन छिद्रांवाटे बाहेर पडून कचरा चाळणीत जमा होतो आणि तेथील जागा स्वच्छ होते. परंतु ज्या वेगाने कचरा आतमध्ये ओढला पाहिजे त्या प्रमाणात ओढत नाही त्यामुळे वेळ लागत आहे. यात आम्ही तांत्रिक मार्गदर्शकाची मदत घेऊन सुधारणा करणार आहोत.

**एकूण खर्च:** ३००० रुपये




LTI Let's Solve | 1 step | Vigyan Ashram

तयारक – न्यू इंग्लिश स्कूल, धामारी
संपर्क - +91 9881044769
ईमेल - nesdhamari101@gmail.com